# श्यामची आई फाउंडेशन...

आज मला तुमच्याबद्दल काय वाटते हे मी तुम्हा सांगणार आहे या पत्राद्वारे. पहीले सांगायचे तर आज मी जी काही घडली आहे ते फक्त आणि फक्त तुमच्यामुळे मी आणि माझे बहीण-भाऊ अगदी लहान होतो तेव्हा तुमची आणि आमची ओळख झाली. आमचे आई-वडील गेल्यानंतर आपल्याला कोणी कोणी सुद्धा समजून घेणार काळजी घेणार नाही हे आम्हा तीघांना जाणवत होतो. आम्ही घाबरून गेलो होतो. नंतर वरिक काय 10-12 दिवसांनी निघून गेले. त्यात मी 10वी नंतर Engineering करत होते. पण पप्पा गेल्यामुळे मी 12वी सोडून द्यायचा विचार केला. त्यावेळेस राणी-दादा ८वी ला होते. एक दिवशी राणी-दादा घरी आले आणि बापट मॅम बद्दल सांगू लागले. मला असं झाल कि काय असा कसा कोणावर विश्वास ठेवायचा. मग मी राणीच्या वर्ग शिक्षीका अंजली तारे यांना भेटले. आणि त्यांनी श्यामची आई फौंडेशन बद्दल मला माहिती सांगितली. 2-3 दिवसांनी मला शितल बापट यांचा फोन आला आणि आम्ही त्यांना भेटायला जायचे ठरवले. आम्ही तिथे गेलो SAF ऑफीसमध्ये. आणि पहील्यांदाच शितल मॅम भेटलो. गेले दिड महीने आम्ही तीघे मनातून मोकळे झालोच नव्हतो आणि बोललोच नव्हतो पण, मॅमशी बोलून आम्ही खूप रडलो त्यासुद्धा रडले त्यांनी आम्हा तिघांना समजून घेतले. समजावून सांगितले. आणि हक्काने सांगितले कि मी आहे तुमच्यासोबत. आणि आमचा हात हातात घेतला. ती भेट अगदी स्मरणात राहील अशी झाली.

त्यांनी आमची शिक्षणाची जबाबदारी घेतली आणि मी ऑफिसला यायला सुरुवात केली. ऑफिस म्हणजे एकदम माझ्या आवडीचे लाडके ठिकाण बनले. मला कोणी विचरले जरीनं की तुझे आवडते ठिकाण कोणते? तर मी माझ्या SAF ऑफिस चं नाव घेते. थोड वेगळं वाटेल पण खरच खूप काही कळत नकळत सगळे काही शिकून गेले हे ऑफिसमधला. ऑफिसमधल्या सगळ्यांनी छोट-छोटी कामे शिकवली. कॉम्पुटर शिकवला. मला काय हवं नको, काय येतय जमतय या सगळ्याकडे सगळ्यांनी खूप लक्ष दिले. आणि या सगळ्या मी रमले. मला 12 वी ला 68% मिळाले सवळ्या 8 महिन्यात मी अभ्यास करून हे मार्क मिळवले होते, त्यामुळे अजूनच कौतुक. यानंतर मी ठरवले BSW कोर्स करायचा. आणि मी ॲडमीशन घेतले. Distance education ला. आणि सुरू झाला 3 वर्षांचा प्रवास. हे सगळ सुरू असताना अचानकपणे माझ्या काकाच्या मुलीने आमच्यावर कोर्ट केस केली. मी गडबडले पण शितलमॅम होत्या सोबत. एकदा असा प्रसंग आला की आम्हाला आम्ही राहतोय त्या घरातूनच बाहेर पडावं लागणार की काय? असा प्रसंग आला. कोर्टमधे केस जिंकून निकाल आमच्या बाजूने लागून घर आम्हाला मिळाले. या सगळ्यात SAF माझ्या सोबत होते. खरच आज मी आरश्या-समोर उभी रहाते तेव्हा खरच प्रश्न पडतो कि ही खरच सोना आहे काय? या सगळ्या प्रवासात एक झाले कि मी मला स्वतः ला मोठं होताना पाहीले. स्वतःला पडताळून पाहिले. स्वतामधले गुण दुर्गुण जाणून घ्यायला लागले. स्वताची मते ठामपणे मांडू

लागले. या सगळ्याला कारण म्हणजे शितल मॅम. यांच्याशिवाय आयुष्याची कल्पनाच करणे अशक्य आहे. गेले 3 वर्ष SAF आमच्या सोबत आहे. सगळे सुरळीत सुरू आहे.
राणी-वाळा 12वी पास झाले आहेत. राणीला 60% मिळाले तर साहिलला 61% मिळालेत. आता राणीला कॉलेज कडून 1 Year work experience Internship मिळाली आहे आणि ती सुद्धा टेल्को कंपनीमध्ये. साहिल आता बावधन येथे embrosia कॉलेज मध्ये BSC Hospitality and studies म्हणजेच हॉटेल मॅनेजमेंट करत आहे. आणि मी माझा 3 वर्षांचा कोर्स पूर्ण झाला आहे. आणि मी पुढच्या वर्षी LL.B ला ॲडमिशन घेणार आहे. माझं स्वप्न आहे. वकिल बनायचं आणि ते मी पूर्ण करणार आहे. माझ्या SAF च्या मार्गदर्शनाने. खरच अजून हा प्रवास सुरू आहे. शितलमॅम म्हणतात तसं अजून story in build आहे, अजून तर खूप-खूप लांब जायचे आहे.